# SANATHNAGAR ENTERPRISES LIMITED

**January 17, 2024**

**To,**
**The Manager,**
**Corporate Relations Dept.,**
**BSE Limited, Phiroze Jeejeebhoy Towers,**
**Dalal Street, Kala Ghoda, Fort,**
**Mumbai, 400001**

**Scrip Code: 509423**

Dear Sirs,

**Sub: <u>Newspaper Advertisement- Un-audited Financial Results for the quarter and nine months ended December 31, 2023</u>**

Pursuant to Regulations 30 and 47 of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, we hereby enclose copies of newspaper advertisement of the un-audited financial results for the quarter and nine months ended December 31, 2023 as published in the following newspapers:

1. Financial Express
2. Mumbai Lakshadweep

The intimation will also be made available on the Company's website at www.sanathnagar.in.

We request you to take the above on record.

Thanking you,

Yours Faithfully,

**For Sanathnagar Enterprises Limited**

SHASHANK NAGAR

Digitally signed by SHASHANK NAGAR
DN: c=IN, o=PERSONAL, pseudonym=6a233efcaf7a4a44a0135285fee469cb, 2.5.4.20=611115e21f4b15129977c8c96347a86500298cb7a9155211d3bcff53ee67f46f, postalCode=201301, st=Uttar Pradesh, serialNumber=6b96bb958aba534661a1895ab0f7bf3dfc7005efb22f06eb4769df99a122f398, cn=SHASHANK NAGAR
Date: 2024.01.17 11:27:08 +05'30'

**Shashank Nagar**
**Company Secretary and Compliance Officer**
**ACS:- A50668**

**Encl.: As above**

Regd. Off.: 412, Floor-4, 17G Vardhaman Chamber, Cawasji Patel Road, Horniman Circle, Fort, Mumbai-400001
Website: www.sanathnagar.in, Email id: investors.sel@lodhagroup.com
Tel.: +91.22 6773 7373 Fax: +91.22.23024420
CIN No. L99999MH1947PLC252768

# अपघाती मृत्यूचे प्रमाण ५० टक्क्यांनी कमी करणार




नवी दिल्ली, दि.१६ : सुरक्षित रस्ते हे सरकारचे प्राधान्य आहे. तसेच आगामी २०३० पर्यंत देशातील अपघाती मृत्यूंचे प्रमाण ५० टक्क्यांनी कमी करण्याचे उद्दिष्ट असल्याचे प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले. रस्ते सुरक्षा-भारतीय रोडस२०३०-सुरक्षेचा स्तर उंचावणे या विषयावरील सीआयआय राष्ट्रीय परिषदेत ते मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

'रस्ते सुरक्षेचे ४ई' अर्थात -अभियांत्रिकी (रस्ते आणि वाहन अभियांत्रिकी)- अंमलबजावणी-शिक्षण आणि आपत्कालीन वैद्यकीय सेवा बळकट करण्यावर लक्ष केंद्रित करण्याबरोबरच सामाजिक वर्तनात बदल करणे खूप महत्वाचे आहे, असे नितीन गडकरी म्हणाले. रस्ते सुरक्षा वाढवण्यासाठी सर्व संबंधित घटकांच्या सहकार्यावर त्यांनी भर दिला. रस्ते अपघात २०२२ च्या ताज्या अहवालानुसार ४ लाख ६० हजार रस्ते अपघात, त्यात १ लाख ६८ हजार मृत्यू आणि ४ लाख गंभीर जखमी झाले आहेत. देशात दर तासाला ५३ रस्ते अपघात होतात तर १९ मृत्यू होतात असे नितीन गडकरी यांनी सांगितले. रस्ते अपघातांमध्ये १२ टक्क्यांनी वाढ झाली आहे, रस्ते अपघातातील मृत्यूंमध्ये १० टक्क्यांनी वाढ झाली आहे, परिणामी जीडीपीमध्ये ३.१४ टक्के सामाजिक-आर्थिक नुकसान झाले आहे, असे ते म्हणाले. अपघाती मृत्यूंपैकी ६० टक्के मृत्यू हे १८ ते ३५ वर्षे वयोगटातील तरुणांचे झाले आहेत. अपघाती मृत्यू म्हणजे कुटुंबातील कमावत्या व्यक्तीचे नुकसान, नियोक्त्याचे व्यावसायिक नुकसान आणि अर्थव्यवस्थेचे एकूण नुकसान असल्याचे गडकरी यांनी सांगितले.

नागरीकांमधील चांगल्या वाहतूक वर्तनासाठी पुरस्कार प्रणालीचे नागपूरमध्ये सकारात्मक परिणाम दिसून आले आहेत, असे गडकरी म्हणाले. वाहनचालकांची नियमित नेत्र तपासणी करावी यावर त्यांनी भर दिला. संस्थांनी त्यांच्या कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारीचा भाग म्हणून त्यासाठी मोफत शिबिरे आयोजित करावीत असेही सांगितले. शाळा, महाविद्यालयांमध्ये शिक्षण आणि जागरूकता, स्वयंसेवी संस्था, स्टार्ट-अप्स, तंत्रज्ञान पुरवठादार, आयआयटी, विद्यापीठे, वाहतूक आणि महामार्ग प्राधिकरणांशी सहकार्य हा रस्ते सुरक्षेसाठी चांगल्या पद्धतींचा प्रसार करण्याचा मार्ग असल्याचे गडकरी म्हणालेत.

# अयोध्येत प्रज्वलीत केली १०८ फूटांची अगरबत्ती



अयोध्या, दि.१६ : अयोध्येत २२ जानेवारीला भव्य राम मंदिरात रामलल्लाचा अभिषेक आणि प्राणप्रतिष्ठा होणार आहे. राम मंदिर प्रतिष्ठापनेच्या पार्श्वभूमीवर १०८ फूट लांब अगरबत्ती प्रज्वलित करण्यात आली आहे.

अयोध्येसह भारताच्या कानाकोपऱ्यातील लोक प्रभू श्रीरामाच्या भक्तीत तल्लीन होऊन राम नामाचा जप करत आहेत. रामलल्ला प्रतिष्ठापना कार्यक्रमाला सुरुवात झाली असून हा कार्यक्रम २२ जानेवारीपर्यंत चालणार आहे. यामध्ये अनेक विधी, यज्ञ केले जाणार आहेत. श्री राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्यापूर्वी देशाच्या कानाकोपऱ्यातून रामभक्त आणि अनेक प्रकारच्या भेटवस्तू अयोध्येत पोहोचत आहेत. प्राणप्रतिष्ठा सोहळ्यापूर्वी भव्य अगरबत्तीची खूप चर्चा रंगली आहे.

राम मंदिरासाठी खास अगरबत्ती तयार करण्यात आली असून ही अगरबत्ती सुमारे दीड महिने प्रज्वलित राहील, असे सांगण्यात येत आहे. ही खास अगरबत्ती गुजरातच्या वडोदरामध्ये तयार करण्यात आली आहे. या अगरबत्तीची लांबी १०८ फूट आणि वजन ३५०० किलो आहे. आज राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला सुरुवात होताच ही भव्य अगरबत्ती प्रज्वलित करण्यात आली आहे. याचा व्हिडीओही समोर आला आहे.

राम मंदिराच्या उद्घाटनासाठी अयोध्येत पोहोचलेली ही १०८ मीटर लांब अगरबत्ती आज पेटवण्यात आली. ही १०८ मीटर लांब अगरबत्ती गुजरातच्या वडोदरा येथून अयोध्येमध्ये पोहोचली आहे. ही अगरबत्ती बनवण्यासाठी सहा महिने लागले. ही अगरबत्ती अयोध्येला पोहोचल्यानंतर श्री रामभूमी तीर्थ क्षेत्राचे अध्यक्ष महंत नृत्य गोपाल दास जी महाराज यांच्या उपस्थितीत 'जय श्री राम'च्या जयघोषात ती प्रज्वलित करण्यात आली. या अगरबत्तीची रुंदी ३.५ फूट आहे. १४७० किलो शेण, ४२० किलो जडीबुटी, ३७६ किलो गुग्गुलू, ३७६ किलो नारळाच्या शेंड्या आणि १९० किलो तूप मिसळून ही अगरबत्ती तयार करण्यात आली आहे. त्याचा सुगंध अनेक किलोमीटरपर्यंत पसरल्याचे दिसून आले.


**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given that **MR. KISHOR MULRAJ ASHER** AND **MR. PRADIP MULRAJ ASHER** are members in respect of Flat No.: 609, on 6th floor, in the building of the society having below mentioned address. **MR. KISHOR MULRAJ ASHER** died on 14/11/2021. **MR. PRADIP MULRAJ ASHER,** the legal heir of the said deceased member has applied for membership in respect of said Flat No.: 609, on 6th floor.

The society hereby invites claims or objections with certified documents from the heir / heirs or other claimants / Objectors to the transfer of the said share and interest of the deceased members in the capital / Property of the society for transferring the said Flat No.: 609, on 6th floor to **MR. PRADIP MULRAJ ASHER,** within a period of fifteen days from the date of publication of Notice and contact the Hon. Secretary of the society between 5.00 p.m. to 7.00 p.m.

If no claims / objections are received within the period prescribed above, the Society shall be free to deal with the Shares and interest of the deceased members in the capital / property of the society in such manner as are provided under the Bye – Laws of the society.

**Hon. Secretary**
**Khajuria Nagar A-3 Co-op. Hsg. Soc. Ltd.,**
Khajuria Tank Road, Kandivali West,
Mumbai – 400067

Place : Mumbai
Date : 17/01/2024


# धुळ्यातील शिंदखेडा तालुक्यातील सहा गावात विकसित भारत संकल्प यात्रा संपन्न

धुळे, दि.१६ : भारत सरकारच्या फ्लॅगशिप योजनांचे लाभ लक्षित वंचित लाभार्थींपर्यंत पोहोचावेत, यासाठी केंद्र शासनाच्या वतीने विकसित भारत संकल्प यात्रा ही देशव्यापी मोहीम आखण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र असलेले मात्र अद्याप ज्यांना लाभ मिळू न शकलेल्या पात्रताधारक व्यक्तिंपर्यंत केंद्र शासनाच्या महत्वाकांक्षी योजनांचा लाभ पोहोचावा म्हणून केंद्र शासनातर्फे धुळे जिल्ह्यात विकसित भारत संकल्प यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानुसार शिंदखेडा तालुक्यातील आच्छी, हिसपूर,कामपुर, सोनशेलू, दराने, रोहने या ग्रामपंचायतीमध्ये विकसित भारत संकल्प यात्रा उत्साहात संपन्न झाली.

यावेळी विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून ग्रामस्थांना केंद्र शासनाच्या विविध योजनांची माहिती एलईडी व्हॅनमार्फत देण्यात आली. यात्रेदरम्यान लाभार्थ्यांकडून विविध योजनांचे अर्ज भरुन घेण्यात आले तसेच लाभार्थ्यांना आयुष्मान भारत कार्डचे वितरण करण्यात आले. यात्रेत उज्वला गॅस नोंदणी,आयुष्मान भारत कार्ड नोंदणी, आधार कार्ड नोंदणी तसेच नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. यात्रेच्या माध्यमातून नागरिकांना योजनेची माहिती पुस्तिकचे वाटप करण्यात आले. तसेच शेतकऱ्यांना ड्रोनद्वारे फवारणीचे प्रात्याक्षिक दाखविण्यात आले.यावेळी मेरी कहानी मेरी जुबानी अंतर्गत लाभार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रारंभी यात्रेचे स्वागत ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामस्थांच्यावतीने करण्यात आले.या कार्यक्रमांस सरपंच,उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य, लोकप्रतिनिधी, अंगणवाडी कार्यकर्ती, मदतनीस, आशा वर्कर, बचत गट अध्यक्ष, ग्रामस्थ व लाभार्थी तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

# ११ हजार भाविकांच्या उपस्थितीत होणार सव्वा लाख हनुमान चालीसा पाठ

लासलगाव, दि.१६ : अयोध्या येथे प्रभू रामचंद्र यांच्या प्राणप्रतिष्ठे निमित्त लासलगाव शहरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.२२ जानेवारी रोजी लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात ११ हजार भाविकांच्या उपस्थितीत सव्वा लाख हनुमान चालीसा पाठ आयोजन करण्यात आला आहे.

गेल्या वर्षी लासलगाव शहरात समस्त हिंदू समाजाच्या वतीने होळी ते हनुमान जयंती निमित्त शहरातील सर्वच मंदिरांमध्ये हनुमान चालीसा पठणाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला होता.लासलगाव, पिंपळगाव नजीक,टाकळी विंचूर,कोटमगाव ,ब्राह्मणगाव विंचूर यासह परिसरातील अनेक गावातील नागरिक या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित होते.देशभरात राम मंदिराचा उत्सव हा आगळावेगळा स्वरूपात साजरा केला जात आहे त्याच धर्तीवर येथे पुन्हा एकदा हनुमान चालीसा पठणाचा कार्यक्रम लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात २२ जानेवारी रोजी रात्री ८ वाजता आयोजित करण्यात आला आहे.आकर्षक विद्युत रोषणाई या ठिकाणी करण्यात येणार असून भव्य स्क्रीनवर उपस्थित भाविकांना हनुमान चालीसा पठणाचा लाभ घेता येणार आहे.प्रभू रामचंद्रांच्या जीवनावर आधारित अनेक देखावे यावेळी सादर केले जाणार आहेत भव्य दिव्य रांगोळी या ठिकाणी साकारली जाणार असून फ ुलांची आकर्षक सजावट या ठिकाणी करण्यात येणार आहे.


रोज वाचा
दै. 'मुंबई लक्षदीप'



**जाहीर नोटीस**

सर्व संबंधितास कळविण्यात येते कि, मौजे चुळने, ता वसई, जि पालघर येथील गावठाण मिळकतीवर बांधलेली वसई विरार शहर महानगरपालिका मालमत्ता क्र. व्हिएन०२/४१००२, हाउस न. ४८/४८/बी/सी, क्षेत्र ५८५ चौफुट (असेसमेंट प्रमाणे), सोनाली गार्डनच्या शेजारी, भोकरी शेजोळ, मौजे चुळने, वसई रोड पश्चिम हि मिळकत श्री जेकब टॉमस डिसोज़ा यांच्या मालकी व कब्जेवहिवाटीत आहे आणि ते व श्रीमती ब्लांची जेकब डिसोज़ा ह्या मिळकतीवर आमचे अशिल कम्पॅनियन को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. यांच्याकडून कर्ज घेणार असून त्या करिता सदर मिळकत गहाण ठेवत आहेत.

तरी या संदर्भात जर कोणीही इसमांचा विक्री, गहाणवट, बक्षिसपत्र, दान, दावा, भाडेपट्टा, वैगरे हक्काने एखादा बोजा असल्यास तो त्यांनी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत लेखी कागदोपत्री पुराव्यासहित निम्नलिखित स्वाक्षिकारांना मे. एस. पी. कन्सलटंट, अनिता शॉपिंग सेंटर, १ला मजला, पोस्ट ऑफिस समोर, वसई रोड (प.), ४०१२०२, या पत्त्यावर कळवावा, नपेक्षा सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारे हक्क नाही व तो असल्यास सोडून दिलेला आहे असे समजण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ता. १७/०१/२०२४
**अशिलांतर्फे अँड. पायस डिमेलो**



**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given to Public at large that **Mr. Israr Ahmed Shaikh & Mr. Mozzam Shaikh** were holding Flat No. 203, on the Second Floor, in K K Villa Co-Op. Hsg. Soc. Ltd. situated at Plot No. 175, Sector – 20, Ulwe, Navi Mumbai 410206, Mr. Israr Ahmed Shaikh passed away on 06/08/2018, without making any nomination.

My Client Smt. Razia Israr A. Shaikh, Wasim Israr Ahmed Shaikh, Sultana Hanif Kazi & Nazia Abdul Basit Tole are only Heirs and legal representatives of Late Mr. Israr Ahmed Shaikh and furthermore Smt. Razia Israr A. Shaikh is in use and occupation of the said Flat / Property.

Therefore if any person, Bank & Financial Institution having any claim, or right, charge, interest, objections in the said Flat/ property or part thereof by way of inheritance, share, sale, mortgage, lease, lien, license, gift, possession or occupation or objectors to the transfer of the shares and interest of the deceased Member in the capital / property of the society, howsoever or otherwise is hereby required to notify the same to undersigned in writing within a period of 15 days from the publication of this notice, with copies of such documents and other proofs in support of his/her/their claims/objection for transfer of share and interest of the deceased Member in the capital/property of the Society. If No claims /objections are received within period of prescribed above, the society shall be free to deal with the shares and interest of the deceased Member in the capital / property of the Society in such manner as is provided under the bye-laws of the Society.

S/d
**Adv. Manohar P. Mhaskar**
**(Advocate, High Court)**,
Office : D/604 RNA Courtyard, Opp. P. V. Doshi Hospital, Dr. Babasaheb Ambedkar Road, Mira Road East, Thane – 401107. Phone No. 9820666127.


# 'डीपफेक'चा सामना करण्यासाठी ७ दिवसात कठोर नियम

नवी दिल्ली, दि.१६ : 'डीपफेक्स'चा सामना करण्यासाठी येत्या ७ दिवसांत कठोर आयटी नियम अधिसूचित केले जाण्याची शक्यता आहे. केंद्रीय माहिती तंत्रज्ञान आणि इलेक्ट्रॉनिक्स राज्यमंत्री राजीव चंद्रशेखर यांनी आज, मंगळवारी याबाबत माहिती दिली. राष्ट्रीय स्टार्टअप दिनानिमित्त उत्तर प्रदेशच्या नोएडा येथील बोट निर्मिती युनिटला त्यांनी भेट दिली. तेथील कर्मचारी आणि सहसंस्थापक अमन गुप्ता यांच्याशी त्यांनी संवाद साधला.

या कार्यक्रमानंतर डीपफेक संदर्भात राजीव चंद्रशेखर म्हणाले की, सरकारने सोशल मीडिया आणि ऑनलाइन प्लॅटफॉर्म्सना आधीच स्पष्ट केले आहे की जर 'डीपफेक्स' वरील सल्ला पूर्णपणे पाळला गेला नाही तर नवीन आयटी नियम आणले जातील. एका कार्यक्रमादरम्यान स्वतंत्रपणे बोलताना चंद्रशेखर म्हणाले की, अनुपालनाच्या पातळीवरील दृष्टीकोन संमिश्र आहे. मी यापूर्वी सांगितले होते की शासनाच्या सल्लूयाचे पूर्णपणे पालन केले जात नसल्याचे आढळल्यास आम्ही या संदर्भात आयटी नियमांमध्ये स्पष्टपणे सुधारणा करू आणि त्यास सूचित करू. सुधारित आयटी नियम आठवडाभरात येण्याची शक्यता आहे. मंत्री म्हणाले की, यासंदर्भातील चर्चे नंतर लक्षात आलेले मुद्दे आता आयटी नियमांमध्ये समाविष्ट केले जातील. हे नवे आयटी नियम पुढील आठवड्यात येण्याची शक्यता असल्याचे राजीव चंद्रशेखर यांनी स्पष्ट केले.

# धुक्याच्या समस्येचा सामना करण्यासाठी ६ सूत्री कार्यक्रम

नवी दिल्ली, दि.१६ : केंद्रीय नागरी उड्डयन मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी आज, मंगळवारी देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यावसायिक उड्डाण ऑपरेशनमध्ये धुक्यामुळे उद्भवलेल्या समस्यांना तोंड देण्यासाठी सहा-सूत्री कृती योजना जाहीर केली. आजकाल धुक्यामुळे शेकडो उड्डाणे उशीर किंवा रद्द होत आहेत. एका सोशल मिडीया पोस्टमध्ये, शिंदेंनी सांगितले की, प्रवाशांची गैरसोय कमी करण्यासाठी एअरलाइन्सना नवीन मानक ऑपरेटिंग प्रक्रिया जारी केल्या आहेत.

याबाबत शिंदे म्हणाले की. सरकारकडे सर्व ६ मेट्रो शहरांच्या विमानतळांचे दैनंदिन अहवाल तसेच नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाच्या निर्देशांच्या अंमलबजावणीचे अहवाल आहेत. दिल्ली विमानतळाचा रनवे २९एल सीएटी खखख कार्यान्वित करण्यात आला आहे, जेणेकरून कमी दृश्यमानतेच्या परिस्थितीतही ते टेक-ऑफ आणि निर्गमन हाताळू शकेल. तसेच सीएटी खखख दर्जा असलेला रनवे १०/२८ देखील शक्य तितक्या लवकर कार्यान्वित केला जाईल असे त्यांनी सांगितले. विमान प्रवाशांमध्ये धुक्यामुळे होणाऱ्या विलंबाबाबत प्रवाशांमध्ये तीव्र संताप व तणावाचे वातावरण आहे. विमानात बसण्यासाठी प्रवाशांना तासनतास धावपट्टीवर रांगेत उभे राहावे लागले. इंडिगोच्या प्रवाशाने दिल्ली-गोवा फ्लाइटच्या कॅप्टनवर हल्ला केला होता. विमानाला तब्बल १० तासांपेक्षा जास्त उशीर झाल्यामुळे प्रवासी संतप्त झाला होता. देशाच्या उत्तर आणि ईशान्य भागात गेल्या १५ दिवसांत सकाळच्या वेळी धुक्यामुळे रस्ते आणि रेल्वे तसेच हवाई वाहतुकीवर गंभीर परिणाम झाला आहे. सोमवारी दिल्ली विमानतळावर ५ उड्डाणे वळवण्यात आली, तर १०० हून अधिक उड्डाणांना उशीर झाला होता. दरम्यान, दाट धुक्यामुळे अनेक ठिकाणी दृश्यमानता शून्य मीटरपर्यंत पोहोचल्याने, भारतीय हवामान विभागाने लोकांना अनावश्यक प्रवास टाळण्याचा आणि वाहन चालवताना सावधगिरी बाळगण्याचा सल्ला दिला आहे.


**PUBLIC NOTICE**

Take notice that **Flat No. 404**, admeasuring about **365 Sq. Ft.** Built up area, in the **building No. 4**, In the building known as **"Pawan Sut Co-Operative Housing Society Ltd;** Situated at **Pawan Baug, Chincholi Phatak Road, Off S. V. Road, Malad-West, Mumbai-400064;** on the part of land bearing **Survey No. 40, 41, 42 & 50 Hissa No. 1 & 2, lying being and situate at Village Borivali, Taluka Borivali in Greater Mumbai**., is in name of **Mrs. Prabha Gunpal Shetty.**

One of the Title Deed i.e. Original Agreement for Sale executed between **M/s. Sharad Kumar Gaurishankar & Co.** as the Promoter of the First Part and **Girdharilal Sharma** as the Party of the Second Part, duly stamped has been lost and Misplaced.

Purpose of the notice is that if any of person finds the said Original Agreement for Sale or any claiming thereof whatsoever they should intimate us in writing within **14 days** from date of the publication. Thereafter no claim or objection will be considered.

**Place: Mumbai,** **For Pradip Shukla & Co.**
**Date: 17-1-2024.** **302/A, D8, Yogi Prabhat Society, Next to Vipul Dry-Fruit Store,Yogi Nagar, Borivali-West, Mumbai-92**



**नॅशनल स्टॅन्डर्ड (इंडिया) लिमिटेड**

सीआयएन : L27109MH1962PLC265959
नोंदणीकृत कार्यालय : ४१२, ४ था मजला, १७जी, वर्धमान चेंबर, कावसजी पटेल मार्ग, हॉर्निमन सर्कल, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
दूर. +९१२२६१३३४४०० फॅक्स +९१ २२२३०२४५५०.
वेबसाइट : www.nsil.net.in ई-मेल : investors.nsil@lodhagroup.com

**दि. ३१.१२.२०२३ रोजी संपलेली तिमाही व नऊमाहीकरिताच्या अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांचा अहवाल**

(रु. लाखांत)

| अ. क्र. | तपशील | तिमाहीअखेर | | नऊमाहीअखेर | वर्षअखेर |
|---|---|---|---|---|---|
| | | ३१.१२.२०२३ (अलेखापरीक्षित) | ३१.१२.२०२२ (अलेखापरीक्षित) | ३१.१२.२०२३ (अलेखापरीक्षित) | ३१.०३.२०२३ (लेखापरीक्षित) |
| १ | परिचालनातून एकूण उत्पन्न | १८८१.५५ | ८५५.०७ | २८०६.१७ | २७९२.०९ |
| २ | करपूर्व कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (कर, अपवादात्मक व/वा असामान्य बाबीपूर्व) | ६५७.४९ | ४७९.५९ | १४२३.०२ | १२०१.७७ |
| ३ | करपूर्व कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक व/वा असामान्य बाबीपश्चात) | ६५७.४९ | ४७९.५९ | १४२३.०२ | १२०१.७७ |
| ४ | करपश्चात कालावधीकरिता नफा/(तोटा) (अपवादात्मक व/वा असामान्य बाबीपश्चात) | ४९१.६२ | ३२३.७८ | १०५१.७८ | ८२४.७७ |
| ५ | **कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीकरिताचा (करपश्चात) नफा/(तोटा) व अन्य सर्वसमावेशक उत्पन्न (करपश्चात) यांचा समावेश)** | **४९१.६२** | **३२३.७८** | **१०५१.७८** | **८२४.७७** |
| ६ | समभाग भांडवल (दर्शनी मूल्य प्रत्येकी रु. १०/-) | २०००.०० | २०००.०० | २०००.०० | २०००.०० |
| ७ | राखीव (पुनर्मूल्यांकन राखीव वगळता), गत वर्षाच्या लेखापरीक्षित ताळेबंदामध्ये दर्शविल्यानुसार | | | | २२४३९.८७ |
| ८ | उत्पन्न प्रति शेअर (दर्शनी मूल्य रु. १०/- प्रत्येकी) (अवार्षिकीकृत) मूलभूत व सौम्यीकृत | २.४६ | १.६२ | ५.२६ | ४.१२ |

टीपा : १) वरील विवरण हे सेबी (सूची व अन्य विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ च्या विनियमन ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजेसकडे दाखल करण्यात आलेल्या तिमाही वित्तीय निष्कर्षांच्या विस्तृत प्रारूपाचा सारांश आहे. तिमाही लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांचे संपूर्ण प्रारूप बीएसई लिमिटेडची वेबसाइट www.bseindia.com वर तसेच कंपनीची वेबसाइट (www.nsil.net.in) वर उपलब्ध आहे.

संचालक मंडळाकरिता व त्यांच्या वतीने
नॅशनल स्टॅन्डर्ड (इंडिया) लिमिटेडकरिता
सही/-
स्मिता घाग
(अध्यक्षा)

ठिकाण : मुंबई
दिनांक : १६.०१.२०२४
डीआयएन : ०७१२८९९२
डीआयएन : ०२४४७३६२


# रुग्णालय खासगी संस्थेला देऊन सुरू करण्याची घाई सत्ताधाऱ्यांकडून सुरू - आ. प्रणिती शिंदे

सोलापूर, दि.१६ : सोलापुरातील गुरुनानक चौकातील जिल्हा रुग्णालयातील फर्निचरची निविदा प्रलंबित असून काम पूर्ण होण्यासाठी सहा महिने लागतील. तरीदेखील आरोग्य विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागाकडून रुग्णालय ताब्यात घेतले. लोकसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून रुग्णालय खासगी संस्थेला देऊन सुरू करण्याची घाई सत्ताधाऱ्यांकडून सुरू असल्याचा आरोप आमदार प्रणिती शिंदेंनी पत्रकारांशी बोलताना केला आहे.

जिल्हा रुग्णालयात १०० खाटा सर्वच आजारांवरील रुग्णांसाठी तर १०० खाटा महिला व बालकांसाठी असणार आहेत. या रुग्णालयात कर्मचारी भरती करण्यासाठी खासगी कंपनीला कंत्राट देण्यात आले आहे.

या कंपनीद्वारे बीएएमएस डॉक्टर, आशासेविका, नर्सेस, वॉर्ड बॉय, तंत्रज्ञ आणि सफाई कामगारांची भरती केली जाणार आहे. भरतीसाठी कोणतीही परीक्षा न घेता अधिकाऱ्यांच्या सांगण्यावरून कर्मचाऱ्यांना नियुक्ती दिली जात आहे. त्यामुळे या पदांसाठी पात्र असलेल्या उमेदवारांना सरकारी नोकरीपासून वंचित राहावे लागणार आहे.

# आगामी विधानसभा निवडणुकीत जनता तुमचा हिशोब करेल - बाबासाहेब देशमुख

सोलापूर, दि.१६ : आगामी विधानसभा निवडणुकीत जनताच तुमचा हिशोब करेल, अशा शब्दात शेतकरी कामगार पक्षाच्या पुरोगामी युवक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी आमदार शहाजीबापू पाटील यांना इशारा दिला.

सर्वसामान्य कार्यकर्त्यांना हिशोब, गणित घालायला विद्यमान आमदार माहीर आहेत. गेल्या तीस वर्षांपासून अशा हिशोबावरच त्यांची गुजराण केल्याचे डॉ. बाबासाहेब देशमुख म्हणाले. अशा हिशोबातूनच १९९९ ला हेच आमदार जेलवारीही करून आले आहेत. असे हिशोब घालूनच तुम्ही तालुक्यातील असंख्य सर्वसामान्य कार्यकर्त्यांची राखरांगोळी केल्याचे देशमुख म्हणाले. त्यामुळे हिशोब, गणित घालायच्या भानगडीत पडू नका, असे देशमुख म्हणाले.

# सोलापूर झेडपीकडून ४६८ शिक्षकांची जाहिरात 'पवित्र'वर अपलोड

सोलापूर, दि.१६ : सोलापूर जिल्हा परिषदेने सोमवारी (ता. १५) शिक्षक भरतीची जाहिरात शालेय शिक्षण विभागाच्या पवित्र पोर्टलवर अपलोड केली आहे. त्यानुसार आता सोलापूर जिल्हा परिषदेला मराठी, इंग्रजी, कन्नड व उर्दू माध्यमाचे एकूण ४६८ शिक्षक मिळणार आहेत. फेब्रुवारीअखेर शिक्षक भरतीची प्रक्रिया संपविली जाणार आहे.सोलापूर जिल्हा परिषदेच्या दोन हजार ७९५ शाळा आहेत. साधारणत: सात वर्षांपासून शाळांमधील संपूर्ण रिक्त पदांची भरती न झाल्याने विद्यार्थ्यांच्या प्रमाणात शिक्षक कमीच होते. आता शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी ऐतिहासिक शिक्षक भरती करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला. त्यानुसार सोलापूर जिल्हा परिषदेने मराठी, उर्दू व कन्नड माध्यमांच्या शाळांमधील रिक्त पदांची बिंदुनामावली मागासवर्गीय कक्षाकडून अंतिम करून घेतली.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली, प्रभारी शिक्षणाधिकारी प्रसाद मिरकले, महापालिकेचे प्रशासनाधिकारी संजय जावीर यांनी त्यासाठी विशेष परिश्रम घेतले. 'कन्नड'ची बिंदुनामावली अल्पावधीत पूर्ण करून काही दिवसांत त्याची मान्यता मिळविली आणि शेवटच्या दिवशी जाहिरात 'पवित्र'वर अपलोड केली हे विशेष. आता जानेवारीअखेर उमेदवारांना प्राधान्यक्रम भरून द्यावे लागतील.प्राधान्यक्रमात उमेदवारांना किती जिल्हा परिषदांचा पर्याय द्यायचा याचे बंधन नाही. त्यानंतर गुणवत्ता यादी प्रसिद्ध होईल व संबंधितांना नेमणुका मिळतील. एकूण रिक्त पदांपैकी ७० टक्के पदे सध्या भरली जात आहेत.


**सनथनगर एन्टरप्रायझेस लिमिटेड**

सीआयएन : L99999MH1947PLC252768
**नोंदणीकृत कार्यालय :** ४१२, ४ था मजला, १७जी, वर्धमान चेंबर, कावसजी पटेल मार्ग, हॉर्निमन सर्कल, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
**दूर. :** ९१ २२ ६७७३७३७३ **फॅक्स :** ९१ २२ २३०२४४२०
**वेबसाइट :** www.sanathnagar.in **ई-मेल :** investors.sel@lodhagroup.com

**दि. ३१.१२.२०२३ रोजी संपलेली तिमाही व नऊमाहीकरिताच्या अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांचा अहवाल**

(रु. लाखांत, प्रतिशेअर माहिती वगळता)

| अ. क्र. | तपशील | तिमाहीअखेर | | नऊमाहीअखेर | वर्षअखेर |
|---|---|---|---|---|---|
| | | ३१.१२.२०२३ (अलेखापरीक्षित) | ३१.१२.२०२२ (अलेखापरीक्षित) | ३१.१२.२०२३ (अलेखापरीक्षित) | ३१.०३.२०२३ (लेखापरीक्षित) |
| १ | परिचालनातून एकूण उत्पन्न | १७७.५९ | - | १८८.०७ | १३३.९३ |
| २ | करपूर्व कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (कर, अपवादात्मक व/वा असामान्य बाबीपूर्व) | १३२.५४ | १४५.२५ | १३१.४३ | ३०.५७ |
| ३ | करपूर्व कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक व/वा असामान्य बाबीपश्चात) | १३२.५४ | १४५.२५ | १३१.४३ | ३०.५७ |
| ४ | करपश्चात कालावधीकरिता नफा/(तोटा) (अपवादात्मक व/वा असामान्य बाबीपश्चात) | ११०.६० | १४२.८४ | १०९.४९ | ३०.५७ |
| ५ | कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीकरिताचा (करपश्चात) नफा/(तोटा) व अन्य सर्वसमावेशक उत्पन्न (करपश्चात) यांचा समावेश) | ११०.६० | १४२.८४ | १०९.४९ | ३०.५७ |
| ६ | समभाग भांडवल (दर्शनी मूल्य प्रत्येकी रु. १०/-) | ३१५.०० | ३१५.०० | ३१५.०० | ३१५.०० |
| ७ | राखीव (पुनर्मूल्यांकन राखीव वगळता), गत वर्षाच्या लेखापरीक्षित ताळेबंदामध्ये दर्शविल्यानुसार | | | | १५१६.१२ |
| ८ | उत्पन्न प्रति शेअर (दर्शनी मूल्य रु. १०/- प्रत्येकी) (अवार्षिकीकृत) मूलभूत व सौम्यीकृत | ३.५१ | ४.५३ | ३.४८ | ०.९७ |

टीपा :
१) वरील विवरण हे सेबी (सूची व अन्य विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ च्या विनियमन ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजेसकडे दाखल करण्यात आलेल्या दि. ३१.१२.२०२३ रोजी संपलेली तिमाही व नऊमाहीकरिताच्या वित्तीय निष्कर्षांच्या विस्तृत प्रारूपाचा सारांश आहे. तिमाही लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांचे संपूर्ण प्रारूप बीएसई लिमिटेडची वेबसाइट www.bseindia.com वर तसेच कंपनीची वेबसाइट (www.sanathnagar.in) वर उपलब्ध आहे.

संचालक मंडळाकरिता व त्यांच्या वतीने
सनथनगर एन्टरप्रायझेस लिमिटेडकरिता
सही/-
संज्योत रांगणेकर
(अध्यक्ष)

ठिकाण : मुंबई
दिनांक : १६.०१.२०२४
डीआयएन : ०७१२८९९२